नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS


वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ५१ Issue - 51 | वार सोमवार दि. ७ जुलै २०२५ Blow- Monday Date 7 Jully 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# बा विठ्ठला... बळीराजाला सुखी व समाधानी ठेव

## राज्यावरील संकटे दूर कर; सर्वांनाच सन्मार्गाने जगण्याची सुबुद्धी दे : मुख्यमंत्र्यांचे विठ्ठल चरणी साकडे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पांडुरंगाने राज्यावरची संकटे दूर करण्याची शक्ती द्यावी, सन्मार्गाने चालण्याची सुबुद्धी द्यावी, बळीराजाला सुखी समाधानी करण्याकरिता आशीर्वाद द्यावा, असे साकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घातले.



आषाढी शुद्ध एकादशी निमित्त श्री विठ्ठल रुक्मिणीची शासकीय महापूजा मुख्यमंत्री फडणवीस यांनी सपत्नीक तसेच मानाचे वारकरी श्री कैलास दामु उगले, सौ. कल्पना कैलास उगले यांच्या समवेत केली. त्यानंतर श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने मुख्यमंत्री महोदय यांचा सत्कार प्रसंगी ते बोलत होते. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, सौ. अमृता फडणवीस, आमदार समाधान आवताडे, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार बाबासाहेब देशमुख, आमदार रणजितसिंह मोहिते पाटील, आमदार संजय सावकारे, आमदार देवेंद्र कोठे, आमदार अभिजीत पाटील, विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांच्यासह समितीचे सर्व सदस्य व अन्य मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, वारीची परंपरा सातत्याने वाढत आहे आणि यावर्षी तर वारीने एक नवीन विक्रम केलेला आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात वारकरी या वारीमध्ये चालत पांडुरंगाच्या दर्शनाकरीता या ठिकाणी आले. ज्या दिंड्या आहेत त्या सोबत तर वारकरी आलेच परंतु पायी चालत ही मोठ्या प्रमाणात वारकरी आले. विशेषत: या वारकऱ्यांमध्ये तरुणांची संख्या मोठी आहे. शासन व प्रशासनाने वारकऱ्यांना चांगल्या सुविधा दिल्या आ-हेत. पालकमंत्री गोरे यांच्या नेतृत्वात प्रशासनाने चांगले जर्मन हँगर तयार केल्याने वारकऱ्यांसाठी चांगली व्यवस्था झाली, असे त्यांनी सांगितले.

### आषाढी एकादशी निमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते विठ्ठल रुक्मिणीची महापूजा

आषाढी एकादशीच्या निमित्ताने पांडुरंगाची पूजा करायला मिळणे हा सर्वांच्या जीवनातला आनंदाचा क्षण आहे. दिंड्या सोबत अनेक वारकरी स्वयंप्रेरणेने पायी चालत आले. वारीत प्रत्येक व्यक्ती इतरांमध्ये पांडुरंग पाह-तो, ही प्रथा जगाच्या पाठीवर कुठेही नाही. वारीत हरीनाम गजर करतांना नवी ऊर्जा मिळते. वारीने खऱ्या अर्थाने भागवत धर्माची पताका उंचावत ठेवली आहे. ही आपली संस्कृती अलौकिक आहे असे सांगून मानाच्या वारकऱ्यांना पांडुरंगाचा आशीर्वाद मिळत राहो, अशी सदिच्छा श्री. फडणवीस यांनी व्यक्त केली.

निर्मल वारीच्या माध्यमातून अतिशय चांगला आवश्यक व्यवस्था उपलब्ध केल्याने कुठेही अस्वच्छता पाहायला मिळाली नाही आणि निर्मल वारी सोबत हरित, पर्यावरण पूरक वारीदेखील झाली. खऱ्या अर्थाने आपल्या संतांनी जो स्वच्छतेचा संदेश दिलेला आहे तो या वारीमध्ये प्रत्यक्ष अनुभवायला मिळाला. राज्याच्या गतीमध्ये अध्यात्मिक प्रगती महत्त्वा-ची असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

### मुख्यमंत्र्यांच्या हस्ते श्री विठ्ठल निर्मल दिंडी पुरस्कार वितरण

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पायी स्वच्छता आणि सामाजिक विषयांवर प्रबोधन करणाऱ्या दिंड्यांचा 'श्री विठ्ठल निर्मल दिंडी' पुरस्काराने सन्मान करण्यात आला. प्रथम क्रमांक – श्री संत रोहिदास दिंडी क्रमांक १३, जगदगुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज पालखी सोहळा. द्वितीय क्रमांक – श्री बाळकृष्णबुवा वारकरी दिंडी क्रमांक १९, श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा. तृतीय क्रमांक – श्री गुरु बाळासाहेब आजरेकर दिंडी क्रमांक २३, श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा.**

यावेळी पालकमंत्र्यांनी आणि जिल्हा प्रशासनाने व्हीआयपी दर्शन बंद करण्याचा निर्णय घेतला, त्यामुळे सर्वसामान्य भाविकांचा श्री विठ्ठल दर्शनाचा कालावधी पाच तासाने कमी झाल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले.

प्रारंभी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी प्रस्तावित केले. यामध्ये यावर्षीच्या आषाढी वारीमध्ये शासन व जिल्हा प्रशासनाने वारकऱ्यांसाठी खूप चांगल्या सुविधा दिल्यामुळे वारकरी वर्ग समाधानी असून वारकऱ्यांची संख्या वाढली आहे व त्यावर योग्य नियंत्रण ठेवले जात असल्याचे त्यांनी सांगितले.

शासकीय महापूजेचे माना-चे वारकरी मु.पो. जातेगांव ता. नांदगांव जि. नाशिक येथील कैलास उगले आणि कल्पना उगले या वारकरी दाम्पत्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व त्यांच्या सुविद्य पत्नी अमृता फडवणीस यांच्या हस्ते महापुजेनंतर यथोचित सन्मान करण्यात आला. तसेच एसटी महामंडळाकडून त्यांना मोफत वर्षभर एसटी पास मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते वितरित करण्यात आला.

# नागपूरसह विदर्भात पावसाची संततधार! सात जिल्ह्यात ऑरेंज अलर्ट जारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : राज्यातील बहुतांश भागात दमदार पावसाने हजेरी लावली असून राज्यातील अनेक मोठे प्रकल्प, तलाव, नदी इत्यादि जलसाठ्यांमध्ये मोठी वाढ झाली आहे. तर पुढे आलेल्या माहितीनुसार, विदर्भातील सात जिल्ह्यात आज जोरदार पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. पूर्व विदर्भातील गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया, भंडारा, नागपूर, आणि वर्धा या सहा जिल्ह्यांसह पश्चिम विदर्भातील अमरावती अशा एकूण ७ जिल्ह्यासाठी हवामान विभागाने आजसाठी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. तर पश्चिम विदर्भातील बुलढाणा, वाशिम, अकोला आणि यवतमाळ या जिल्ह्यांसाठी हवामान विभागाने येलो अलर्ट जारी केले आहे.



जून महिन्यात विदर्भातील फक्त बुलढाणा आणि वाशिम जिल्हे वगळून इतर सर्व जिल्ह्यांमध्ये सरा-सरीपेक्षा कमी पावसाची नोंद झाली होती. मात्र जुलै महिन्यात पावसाने चांगलाच जोर धरला आहे. त्यामुळे आता हवामान विभागाने विदर्भातील सात जिल्ह्यांसाठी ऑरेंज अलर्ट जारी केल्याने दमदार पावसाची अपेक्षा आहे.

**भंडाऱ्यात रात्रीपासून पा-वसाची संततधार**

काल रात्रीपासून भंडारा जिल्ह्यात पुन्हा एकदा पा-वसाची संततधार सुरू झालीय. मागील तीन दिवसात जिल्ह्यात पावसानं उसंत घेतली होती. मात्र, पाऊस पुन्हा सुरू झाल्यानं वाता-वरणात चांगलाच गारवा निर्माण झालाय. दरम्यान, हवामान विभागांना आज भंडारा जिल्ह्याला ऑरेंज अलर्ट दिलाय. त्यामुळे प्रशासनानं नागरिकांनी सतर्क रहावं, असं आ-वाहन केलं आहे.

# तेलंगणा फार्मा फॅक्टरीतील मृतांची संख्या ४२ वर, अजूनही ८ जण सापडेनात; घटनास्थळी हाडं, मानवी सांगाडे मिळाले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हैदराबाद : तेलंगणा फार्मा कारखान्यातील स्फोटातील मृतांची संख्या ४२ वर पोहोचली आहे. रविवारी रुग्णालयात एका व्यक्तीचा मृत्यू झाला, तर डीएनए चाचणीद्वारे एका मृतदेहाची ओळख पटवण्यात आली आहे. ८ जण अजूनही बेपत्ता आहेत. अपघातानंतर ६ दिवसांनीही शोध मोहीम सुरू आहे. अधिकाऱ्यांनी सांगितले की, शनिवार आणि रविवारी अपघातस्थळावरून काही हाडे आणि जळालेले अवयव सापडले. त्यांची डीएनए चाचणी सुरू आहे. जर ते जुळले तर बेपत्ता लोकांची संख्या कमी होऊ शकते. ३० जून रोजी सकाळी सव्वा आठ ते साडे नऊच्या दरम्यान, साडे आठ ते साडे नऊ दरम्यान पासुमिलाराम औद्योगिक क्षेत्रातील सिगाची इंडस्ट्रीजमध्ये हा अपघात झाला. घटनेच्या वेळी कारखान्यात १५० लोक होते, स्फोट झाला त्या ठिकाणी ९० लोक उपस्थित होते. त्या दिवशी बचाव आणि वैद्यकीय पथकाने ३१ मृतदेह बाहेर काढले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीतून मृतांच्या कुटुंबियांना २ लाख रुपये आणि जखमींना ५० हजार रुपये भरपाई जाहीर केली होती. कंपनीने मृतांच्या कुटुंबियांना १ कोटी रुपये, गंभीर जखमींना १० लाख रुपये आणि इतर जखमींना ५ लाख रुपये भरपाई जाहीर केली होती.

३० जून रोजी सकाळी ७ वाजता नाईट शिफ्ट पूर्ण करून बाहेर पडल्याचे एका कामगाराने सांगितले. सकाळच्या शिफ्टचे कर्मचारी आधीच आत आले होते. सकाळी आठ वाजताच्या सुमारास स्फोट झाला. शिफ्ट सुरू होताच मोबाईल बंद होतात. ज्यामुळे आत काम करणाऱ्या लोकांची कोणतीही बातमी मिळू शकली नाही. कामगाराच्या कुटुंबातील एका महिलेने सांगितले की तिच्या कुटुंबातील चार लोक कारखान्यात काम करतात. यामध्ये तिचा मुलगा, जावई, मोठा मेहुणा आणि मेहुणा यांचा समावेश आहे. त्यापैकी तीन जण सकाळच्या शिफ्टमध्ये होते. प्रत्यक्षदर्शींच्या मते, स्फोट इतका जोरदार होता की तिथे काम करणारे कामगार सुमारे १०० मीटर अंतरावर पडले. स्फोटामुळे रिॲक्टर युनिट उद्ध्वस्त झाले आहे.

कंपनीच्या एका कर्मचाऱ्याने सांगितले की, बहुतेक कामगार मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार, ओडिशा आणि पश्चिम बंगालमधील आहेत. ६० हून अधिक कामगार आणि ४० इतर लोकांचा कर्मचारी एकाच शिफ्टमध्ये काम करतात.

फार्मा कंपनीच्या प्लान्टमध्ये झालेल्या स्फोट प्रकरणात जिल्हा पोलिसांनी एफआयआर नोंदवला आहे. एसपी परितोष पंकज म्हणाले की, आम्ही या प्रकरणात बीएनएसच्या कलम १०५, ११० आणि ११७ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. तेलंगणाच्या कारखाना विभागाच्या एका अधिकाऱ्याने असेही सांगितले की, आम्ही या घटनेबद्दल औषध प्रकल्पाच्या व्यवस्थापनाविरुद्ध गुन्हा दाखल करू. आम्ही तपास करत आहोत. आम्ही कारखाने कायदा १९४८ अंतर्गत परवानाधारक आणि युनिटच्या व्यवस्थापकाविरुद्ध नोटीस बजावू आणि त्यांच्याकडून झालेल्या चुकांबद्दल उत्तर मागवू. अधिकाऱ्याने सांगितले की, काही दिवसांत नोटीस बजावली जाण्याची शक्यता आहे.

**ब्रिटीशांच्या मैदानात तिरंगा फडकला** | **दणदणीत विजय**

# भारताचा 'शुभ'आरंभ, इंग्लंडचे गर्वहरण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बर्मिंगहम: इंग्लंडचे गर्वहरण करत भारतीय संघाने ब्रिटीशांच्या मैदानात तिरंगा फडकवला. दुसऱ्या कसोटी सामन्यात भारताने देदिप्यमान कामगिरीचा नजराणा पेश केला. शुभमन गिलने द्विशतकासह भारताच्या विजयचा पाया रचला होता. भारताच्या गोलंदाजांनी त्यावर कळस चढवला आणि त्यामुळे भारताला हा दुसरा सामना जिंकता आला. भारताने या सामन्यात ३३७ धावा राखत मोठा विजय मिळवला. या सामन्यातील विजयासह भारताने मालिकेत १-१ अशी बरोबरी केली आहे. पहिला कसोटी सामना भारताला गमवावा लागला होता. त्यानंतर या सामन्यातील विजयासह युवा भारताने या मालिकेत आता १-१ अशी बरोबरी केली आहे.



शुभमन गिलने पहिल्या डावात द्विशतकत झळकावले, तर दुसऱ्या डावात त्याने शतकही पूर्ण केले. त्यामुळे गिलच्या या धडाकेबाज फलंदाजीच्या जोरावर भारताने इंग्लंडपुढे विजयासाठी ६०८ धावांचे आव्हान ठेवले होते. या आव्हानाचा पाठलाग करताना भारताने इंग्लंडची चौथ्या दिवशी ३ बाद ७८ अशी अवस्था केली होती. त्यानंतर पाचव्या दिवशी भारताला विजयासाठी सात विकेट्सची गरज होती. पण पाचव्या दिवसाच्या सुरुवातीला जोरदार पाऊस आला आणि सामना वेळेत सुरु झाला नाही. पण पावसानंतर भारतीय गोलंदाजांच्या अचूक गोलंदाजीने इंग्लंडच्या फलंदाजांच्या नाकी नऊ आणले होते. खासकरुन आकाश दीप त्यावेळी आग ओकत होता. आकाश दीपने एकामागून एक दोन धक्के इंग्लंडला दिले.

आकाश दीपने प्रथम ऑली पोप-ला २४ धावांवर असताना क्लीन बोल्ड केलं. त्यानंतर आकाश दीपने अप्रतिम चेंडू टाकत भारताच्या विजयाच्या मार्गात अडसर ठरत असलेल्या हॅरी ब्रुक्सला बाद केलं. यावेळी आकाशने एवढा वेगवान चेंडू टाकला की, आपण बाद झालो, हे हॅरीला समजलंच नाही. त्यानंतर बेन स्टोक्सचा अडसर वॉशिंग्टन सुंदरने दूर केला. पण यावेळी जेमी स्मिथ भारताच्या विजयाच्या मार्गातील मोठा काटा होता. पण आकाश दीपने त्याला ८८ धावांवर बाद केले आणि तिथेच भारतीय संघाचा विजय निश्चित झाला. भारताने या सामन्यात अचूक गोलंदाजी केली आणि त्याचा फायदा त्यांना झाल्याचे पाहायला मिळाले.

# मुंबई, ठाण्यासह संपूर्ण राज्यात हवामान विभागाचे तीव्र इशारे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात आज दुपारी अने भागांत पावसाची जोरदार हजेरी लागली. काही ठिकाणी वातावरण ढगाळ असून पुढील तीन ते चार तास महत्त्वाचे राहणार आहेत.



राज्यभर पावसाचा जोर वाढला असून पुढील चार दिवस संपूर्ण राज्यात वादळी वाऱ्यासह पावसाची हजेरी राहणार आहे. उत्तर कोकण, उत्तर महाराष्ट्र दक्षिण गुजरात व मराठवाड्यासह विदर्भाचा बहुतांश भाग पावसाने व्यापणार आहे

किनारपट्टी प्रदेशात बहुतांश भागात अधून मधून वादळी वाऱ्याची शक्यता आहे . आज संपूर्ण किनारपट्टी भागाला पावसाचे तीव्र इशारे देण्यात आले आहेत.

पालघर जिल्ह्यात व पुणे घाट परिसरात आज पावसाचा रेड अलर्ट देण्यात आलाय . रत्नागिरी रायगड ठाणे जिल्ह्यासह नाशिक घाटमाथ्यावर पावसाचा ऑरेंज अलर्ट आहे .

उत्तर महाराष्ट्रात सह संपूर्ण मराठवाड्यात पावसाचा येलो अलर्ट देण्यात आलाय .विदर्भातही पावसाची तुफान हजेरी राहणार आहे .

चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट देण्यात आला असून उर्वरित विदर्भात यलो अलर्ट आहे .

भारतीय हवामान विभागाने पुढील चार दिवसांसाठी राज्यभर हाय अलर्ट दिला असून नागरिकांना सतर्कतेचा इशाराही दिलाय .

## संपादकीय....

### विठ्ठलाला साकडे

पांडुरंगाने राज्यावरची संकटे दूर करण्याची शक्ती द्यावी, सन्मार्गाने चालण्याची सुबुद्धी द्यावी, बळीराजाला सुखी समाधानी करण्याकरिता आशीर्वाद द्यावा, असे साकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आषाढी वारीनिमित्त पंढरपुरात आले असता विठुरायाकडे साकडे घातले. आषाढी शुद्ध एकादशी निमित्त श्री विठ्ठल रुक्मिणीची शासकीय महापूजा मुख्यमंत्री फडणवीस यांनी सपत्नीक तसेच मानाचे वारकरी कैलास दामु उगले, कल्पना कैलास उगले यांच्या समवेत केली. वारीची परंपरा सातत्याने वाढत आहे आणि यावर्षी तर वारीने एक नवीन विक्रम केलेला आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात वारकरी या वारीमध्ये चालत पांडुरंगाच्या दर्शनाकरीता या ठिकाणी आले. ज्या दिंड्या आहेत त्या सोबत तर वारकरी आलेच परंतु पायी चालत ही मोठ्या प्रमाणात वारकरी आले. विशेषतः या वारकऱ्यांमध्ये तरुणांची संख्या मोठी आहे. शासन व प्रशासनाने वारकऱ्यांना चांगल्या सुविधा दिल्या आहेत. पालकमंत्री गोरे यांच्या नेतृत्वात प्रशासनाने चांगले जर्मन हँगर तयार केल्याने वारकऱ्यांसाठी चांगली व्यवस्था झाली. आषाढी एकादशीच्या निमित्ताने पांडुरंगाची पूजा करायला मिळणे हा सर्वांच्या जीवनातला आनंदाचा क्षण आहे. दिंड्या सोबत अनेक वारकरी स्वयंप्रेरणेने पायी चालत आले. वारीत प्रत्येक व्यक्ती इतरांमध्ये पांडुरंग पाहतो, ही प्रथा जगाच्या पाठीवर कुठेही नाही. वारीत हरीनाम गजर करतांना नवी ऊर्जा मिळते. वारीने खऱ्या अर्थाने भागवत धर्माची पताका उंचावत ठेवली आहे. ही आपली संस्कृती अलौकिक आहे असे सांगून मानाच्या वारकऱ्यांना पांडुरंगाचा आशीर्वाद मिळत राहो, अशी सदिच्छा व्यक्त केली. निर्मल वारीच्या माध्यमातून अतिशय चांगला आवश्यक व्यवस्था उपलब्ध केल्याने कुठेही अस्वच्छता पाहायला मिळाली नाही आणि निर्मल वारी सोबत हरित, पर्यावरण पूरक वारीदेखील झाली. खऱ्या अर्थाने आपल्या संतांनी जो स्वच्छतेचा संदेश दिलेला आहे तो या वारीमध्ये प्रत्यक्ष अनुभवायला मिळाला. राज्याच्या गतीमध्ये अध्यात्मिक प्रगती महत्त्वाची आहे. यावर्षीच्या आषाढी वारीमध्ये शासन व जिल्हा प्रशासनाने वारकऱ्यांसाठी खूप चांगल्या सुविधा दिल्यामुळे वारकरी वर्ग समाधानी असून वारकऱ्यांची संख्या वाढली आहे व त्यावर योग्य नियंत्रण ठेवले जात आहे. शासकीय महापूजेचे मानाचे वारकरी मु.पो. जातेगांव ता. नांदगांव जि. नाशिक येथील कैलास उगले आणि कल्पना उगले या वारकरी दाम्पत्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व त्यांच्या सुविद्य पत्नी अमृता फडवणीस यांच्या हस्ते महापुजेनंतर यथोचित सन्मान करण्यात आला. तसेच एसटी महामंडळाकडून त्यांना मोफत वर्षभर एसटी पास देण्यात आला.

# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते एकात्मिक सनियंत्रण कक्ष व 'हरित वारी' ॲपचे उद्घाटन

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सांस्कृतिक भवनाचेही भूमिपूजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सोलापूर ग्रामीण पोलीस दलाच्यावतीने पंढरपूर आषाढी वारीच्या संनियंत्रणासाठी शहर पोलीस ठाण्याच्या मागे स्थापन करण्यात आलेला एकात्मिक सनियंत्रण कक्ष, हरित वारीच्या उपक्रमांतर्गत तयार करण्यात आलेल्या 'हरित वारी' ॲपचे उद्घाटन करण्यात आले.




यावेळी ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, गृह राज्यमंत्री पंकज भोयर, खासदार धैर्यशील मोहिते पाटील, आमदार गोपीचंद पडळकर, समाधान आवताडे, डॉ. बाबासाहेब देशमुख, अभिजित पाटील, सचिन कल्याणशेट्टी, पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक सुनील फुलारी, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, सोलापूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, देवस्थान समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर आदी उपस्थित होते.

आषाढी वारी मार्ग, नदी पात्र, वाळवंट, वाखरी पालखी तळ, ६५ एकर परिसर, पत्रा शेड, प्रदक्षिणा मार्ग, मंदिर परिसर या ठिकाणी ड्रोन कॅमेरे तसेच सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या माध्यमातून अहोरात्र गर्दीचे संनियंत्रण केले जात आहे. कोठे काही घटना घडल्यास तत्काळ नियंत्रण कक्षातील स्क्रीनवर दिसत असल्याने त्या ठिकाणी गतीने पोहोचून स्थिती नियंत्रणात आणता येत आहे असे, पोलीस अधीक्षक श्री. कुलकर्णी यांनी सांगितले.

या एकात्मिक सनियंत्रण कक्षाद्वारे प्राप्त चित्रीकरणाच्या विश्लेषणातून आषाढी वारीसाठी कालपर्यंत पंढरपूर शहरात सुमारे १४ लाख वारकरी दाखल झाल्याचा अंदाज असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

**'हरित वारी' ॲपचे उद्घाटन**

सोलापूर ग्रामीण पोलीस दलाच्यावतीने कम्युनिटी पोलिसिंग अंतर्गत 'हरित वारी' हा उपक्रम राबविण्यात येत असून त्याच्या संनियंत्रणासाठी तयार करण्यात आलेल्या 'हरित वारी' ॲपचे उद्घाटनही यावेळी करण्यात आले.

'हरित वारी' उपक्रमांतर्गत सुमारे दीड लाखावर वृक्षांची लागवड सोलापूर ग्रामीण हद्दीत विविध ठिकाणी करण्यात येणार आहे. प्रत्येक झाडाला स्वतंत्र क्यूआर कोड दिला जाणार आहे. ह्या क्यूआरच्या माध्यमातून प्रत्येक झाडाची जात, त्या झाडाचे जिओ लोकेशन आणि त्याच्या सद्यस्थितीबाबत माहिती उपलब्ध असणार आहे. ॲपचा वापर करण्याचे प्रशिक्षण ठाणे अंमलदारांना देण्यात आले आहे. हे ॲप ब्लॉकचेन तंत्रज्ञानावर आधारित असल्याने वृक्षारोपण मोहिमेतील विश्वासार्हता, पारदर्शकता आणि डिजिटल ट्रॅकिंग शक्य होणार आहे, असे यावेळी श्री. कुलकर्णी यांनी सांगितले.

**राज्य सहकारी बँकेच्यावतीने देवस्थान समितीला इलेक्ट्रिक वाहन प्रदान**

यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्यावतीने विठ्ठल रुक्मिणी देवस्थान समितीला भक्तांच्या सेवेसाठी इलेक्ट्रिक वाहन प्रदान करण्यात आले.

यावेळी बँकेचे प्रशासकीय मंडळाचे अध्यक्ष विद्याधर अनास्कार, मुख्य सरव्यवस्थापक डॉ. अशोक माने, देवस्थान समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर आदी उपस्थित होते.

**मुख्यमंत्र्याच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सांस्कृतिक भवनाचे भूमिपूजन**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सांस्कृतिक भवनाचे स्वातंत्र्यवीर सावरकर चौक येथे भूमिपूजन करण्यात आले. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार समाधान आवताडे, अभिजित पाटील, गोपीचंद पडळकर, सचिन कलशेट्टी, डॉ.बाबासाहेब देशमुख, माजी आमदार प्रशांत परिचारक, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी महेश रोकडे आदी उपस्थित होते.

# दि. पंढरपूर मर्चंट बँक.को.ऑप. बँक पंढरपूर यांच्या वतीने वारकरी बांधवांना फराळ वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : आषाढी यात्रेच्या निमित्ताने आळंदी ते पंढरपूर पायी चालणाऱ्या भाविकांना भक्तांना आषाढी एकादशीनिमित्त दि पंढरपूर को-ऑपरेटिव बँक यांच्यावतीने आज रोज वारकरी भाविक भक्तांना उपासाचे व फराळ यांचे वाटप करण्यात आले.



दि पंढरपूर मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँकेच्या वतीने दरवर्षी आषाढी एकादशीच्या दिवशी भावी भक्तांना उपवासाचे फराळ वाटप करण्यात येत असते त्याचप्रमाणे याही वर्षी देखील दि पंढरपूर मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँक बँकेच्या शाखेसमोर भावी भक्तांना फराळाचे वाटप करण्यात आले बँकेचे व्हाईस चेअरमन शिखरे व माजी चेअरमन श्री नागेश काका भोसले माझी चेअरमन सोमनाथ डोंबे व संचालक अमरजीत पाटील सुधीर भोसले सुनील मोहिते परदेशी व सर्व बँकेचे व्यवस्थापक अतुल मामाने उपव्यवस्थापक कुलकर्णी व बँकेचे कर्मचारी यांच्या उपस्थित फराळाचे वाटप करण्यात आले.

## टाकळीवाडी सुपुत्र माजी सैनिक लक्ष्मण निर्मळे यांचे निधन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



टाकळीवाडी/प्रतिनिधी : टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील सुपुत्र यांचे निधन झाले. १९८९ मध्ये हे भारतीय सेना मध्ये भरती झाले. व जुलै २००६ मध्ये हे सेवानिवृत्त होऊन समाजकार्याचा वसा घेतला. गावातील वृक्षारोपण मध्ये यांचा मोलाचा वाटा होता.

सैनिक फेडरेशन शिरोळ तालुका उपाध्यक्ष व टाकळीवाडी संघटनेचे खजिनदार व धडाडीचे कार्यकर्ते तसेच शिव सुंदर तरुण मंडळाचे संस्थापक अध्यक्ष लक्ष्मण निर्मळे यांचे कमांड हॉस्पिटल पुणे येथे उपचार घेत असताना त्यांचे दुर्दैवी आकस्मित निधन झाले. टाकळीवाडी येथील स्मशानभूमीत त्यांना अखेरची मानवंदना देण्यात आली. १८ ऑपरेशन होऊन सुद्धा यांचे कार्य निरंतर होते. ताईबाई मंदिर बांधकामांमध्ये यांचा मोठा पुढाकार होता. यांच्या पश्चात पत्नी मुलगा, मुलगी असा परिवार आहे.

# मुंबई उच्च न्यायालय, बॉम्बे बार असोसिएशनने मला घडवलं : सरन्यायाधीश भूषण गवई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुंबई उच्च न्यायालयाची ही इमारत, बॉम्बे बार असोसिएशन आणि इथल्या माझ्या सहकाऱ्यांनी मला घडवलं. आज जे काही आहे ते या संस्थांमुळेच. बॉम्बे बार असोसिएशन ही संस्था माझी कुटुंबासारखी आहे. या संस्थेच्या पाठिंब्याशिवाय मी आज या पदावर असू शकलो नसतो. ही वकिल संघटना म्हणजे न्यायव्यवस्थेला विचारवंत देणारी मातृसंस्था आहे, अशा शब्दांत भारताचे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी भावना व्यक्त केल्या.



न्यायमूर्ती श्री. भूषण गवई यांची भारताच्या सरन्यायाधीशपदी नियुक्ती झाल्याबद्दल बॉम्बे बार असोसिएशनच्या वतीने सत्कार करण्यात आला. त्यावेळी श्री. गवई बोलत होते. यावेळी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती दीपांकर दत्ता, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आलोक आराधे, श्री. गवई यांच्या सुविद्य पत्नी डॉ. तेजस्विनी गवई, भारताचे अतिरिक्त सॉलिसिटर जनरल अनिल सिंग, महाराष्ट्र गोवा बार असोसिएशनचे अध्यक्ष विठ्ठल देशमुख, राज्याचे महाधिवक्ता वीरेंद्र सराफ, डव्होकेट असोसिएशन ऑफ वेस्टर्न महाराष्ट्राचे अध्यक्ष प्रशांत रेळेकर, बॉम्बे बार असोसिएशनचे अध्यक्ष नितीन ठक्कर, उपाध्यक्ष व्ही आर धोंड, सचिव फरहान दुभाष आदी उपस्थित होते.

**बॉम्बे बार असोसिएशनतर्फे सरन्यायाधीश भूषण गवई यांचा सत्कार**

आज सत्कार होत असलेल्या कोर्टरुमध्येच लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी केलेली स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे, ही गर्जना आजही आपल्याला प्रेरणा देते, असे सांगून न्यायमूर्ती श्री. गवई यांनी आजपर्यंतचा प्रवास उलगडला. न्यायमूर्ती गवई यांनी आपल्या कारकिर्दीत मुंबई, नागपूर, छत्रपती संभाजी नगर व गोवा खंडपीठांवर काम करतानाचे अनुभव सांगितले आणि हे सर्व अनुभव त्यांच्या न्यायिक दृष्टिकोनाच्या जडणघडणीत कसे उपयुक्त ठरले, हेही स्पष्ट केले.

सरन्यायाधीश श्री. गवई म्हणाले की, संविधान हेच आमचे अंतिम मार्गदर्शक तत्त्व आहे आणि न्यायाधीश म्हणून आमची जबाबदारी केवळ अधिकार वापरण्याची नाही, तर कर्तव्य बजावण्याचीही आहे. रिक्त न्यायाधीश पदं भरली गेली तर प्रलंबित खटल्यांवर नियंत्रण येईल. आम्ही नियुक्ती प्रक्रियेत पारदर्शकता आणत आहोत. गेल्या काही दिवसांत अनेक नवीन नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.

त्यांनी बार असोसिएशनने सुरू केलेल्या 'पॉडकास्ट सिरीज', व 'बीबीए ॲप'चे कौतुक केले.

कार्यक्रमात न्यायमूर्ती दीपांकर दत्ता न्यायमूर्ती गवई यांचे विशेष कौतुक करताना म्हणाले की, न्यायमूर्ती श्री. गवई यांची विधी आणि संविधानातील जाण, विनम्रता आणि कायद्याचा अभ्यास यांचे उदाहरण देशभरातील न्यायाधीशांसाठी आदर्श आहे. नागपूरमधील न्यायालयातून सुरू झालेली न्यायमूर्ती गवई यांची कारकीर्द ही मेहनत, प्रामाणिकपणा आणि मूल्यनिष्ठा यांचे प्रतिक आहे. न्यायमूर्ती श्री. गवई यांचा मुंबई उच्च न्यायालयातील काळ केवळ त्यांच्या ऐतिहासिक निर्णयांसाठीच नव्हे, तर त्यांच्या शांत संयमी, प्रखर कायदेशीर बुध्दिमत्ता आणि सौम्य विनोदबुद्धीसाठीही लक्षात राहतो. त्यांची भारताचे सरन्यायाधीश म्हणून निवड हा फक्त मुंबई बारच नव्हे, तर संपूर्ण मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांसाठीही गौरवाचा क्षण आहे.

मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती श्री. आराधे यांनी मनोगतात श्री. गवई यांच्या कामाचा गौरवपूर्ण उल्लेख केला. ते म्हणाले की, लोकसेवा व न्यायव्यवस्था हीच खरी सेवा हे श्री. गवई यांचे तत्वज्ञान आहे. त्यांनी आतापर्यंत दिलेले निर्णय न्यायव्यवस्थेतील संवेदनशीलता आणि संविधान निष्ठा दर्शवतात. ते दूरदर्शी आहेत. त्यांच्या निर्णयांमुळे जनतेचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ झाला.

यावेळी महाधिवक्ता श्री. सराफ, भारताचे अतिरिक्त सॉलिसिटर जनरल श्री. सिंह यांनीही मनोगत व्यक्त केले. बार असोसिएशनचे अध्यक्ष श्री. नितीन ठक्कर यांनी प्रास्ताविक केले. सचिव फरहान दुभाष यांनी सूत्रसंचालन केले.

## प्रत्येक क्षेत्रात देशाला अग्रेसर ठेवण्याची प्रेरणा पहिल्या बाजीराव पेशव्यांच्या जीवनचरित्रातून : केंद्रीय गृहमंत्री अमित शाह

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : संपूर्ण विश्वात प्रत्येक क्षेत्रात आपला देश पुढे राहील हे आपले जीवन ध्येय असले पाहिजे, यासाठीची प्रेरणा आणि ऊर्जा पहिले बाजीराव पेशवे यांच्या जीवनचरित्रातून मिळते, असे प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केले.

राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (एनडीए) परिसरातील त्रिशक्ती गेट येथे उभारण्यात आलेल्या थोरले बाजीराव पेशवे यांच्या अश्वारूढ पुतळ्याच्या अनावरण कार्यक्रमप्रसंगी ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, नागरी विमान वाहतूक केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, थोरले बाजीराव पेशवे प्रतिष्ठानचे अध्यक्ष एअर मार्शल (नि.) भूषण गोखले, लष्कराच्या दक्षिण कमांडचे प्रमुख ले. जनरल धीरज शेठ, एनडीएचे कमांडट व्हाईस डमिरल गुरचरण सिंग, खासदार मेधा कुलकर्णी, माजी मंत्री रविंद्र चव्हाण, थोरले बाजीराव पेशवे प्रतिष्ठानचे सचिव कुंदनकुमार साठे आदी उपस्थित होते.

केंद्रीय गृहमंत्री श्री.शाह म्हणाले, पहिल्या बाजीरावांनी तंजावर ते अफगाणीस्तानपर्यंत आणि अफगाणीस्तान ते बंगाल कटकपर्यंत मोठ्या हिंदवी साम्राज्याची स्थापना केली जे छत्रपती शिवरायांचे स्वप्न होते. बाजीरावांनी युद्ध नियोजनातील वेग, रणकौशल्य, रणनीती आणि वीर सोबत्यांच्या साथीने अनेक पराभवांना विजयात रुपांतरीत केले. पालखेडच्या विजयाचा अभ्यास बारकाईने केल्यास हा अकल्पनीय होता हे लक्षात येईल. गुलामीचे निशाण उध्वस्त करुन स्वातंत्र्याचा दीप लावण्याचे काम त्यांनी यशस्वीपणे केले. देश-विदेशातील अनेक युद्धकौशल्यातील अभ्यासू सेनानींनी त्यांच्या युद्धकौशल्याविषयी गौरविले आहे.

युद्धनीतीचे काही नियम हे कधीच कालबाह्य होत नाहीत. त्यात व्यूहरचना, वेग, सैन्याची समर्पण भावना, देशभक्ती आणि बलिदान भाव सैन्याला विजय मिळवून देतो. गेल्या पाचशे वर्षातील या सर्व गुणांचे उत्कृष्ट उदाहरण पहिले बाजीराव पेशवे आहेत. त्यांनी त्यांच्या २० वर्षाच्या काळात मृत्यूपर्यंत लढलेली सर्व ४१ युद्धे जिंकली, असेही गौरवोद्गार केंद्रीय गृहमंत्री यांनी काढले.

महान भारताची रचना ही शिवछत्रपतींची प्रेरणा आहे, असे सांगून केंद्रीय गृहमंत्री श्री. शाह म्हणाले, संपूर्ण दक्षिण भारत अनेक जुलमी सत्ताधीरांमुळे पीडित होता आणि उत्तर भारत मुघल साम्राज्याच्या अधीन होता. अशा परिस्थितीत छत्रपती शिवाजी महाराजांनी केवळ हिंदवी स्वराज्याची स्थापनाच केली नाही तर युवक, बालक आदींच्या मनावर स्वराज्याचे संस्कार केले, छत्रपती शिवाजी महाराजांनंतर धर्मवीर संभाजी महाराज, वीर ताराराणी, संताजी -धनाजी आदी अनेक वीरांनी स्वराज्याची ज्योत विझू दिली नाही. त्यानंतर छत्रपती शाहू महाराजांनी बाळाजी विश्वनाथ आणि नंतर पहिल्या बाजीरावांची पेशवा म्हणून नेमणूक केल्यानंतर त्यांनी स्वराज्याची ज्योत तेवत ठेवली.

पहिले बाजीराव यांचे स्मारक बनविण्याची सर्वात उचित जागा कोणती असेल तर ती 'एनडीएच'. कारण येथून देशाच्या तिन्ही सेनादलांचे प्रमुख अधिकारी प्रशिक्षित होऊन बाहेर पडत असतात. येथून बाहेर पडताना श्रीमंत बाजीराव पेशवे यांच्या जीवनकाळाचा अभ्यास करून जेव्हा भविष्यातील सेनानी जातील तेव्हा भारताच्या सीमांना स्पर्श करण्याचे धाडस कोणी करणार नाही. भविष्यात स्वराज्य टिकविण्यासाठी संघर्ष करावा लागल्यास आपली सेना आणि नेतृत्व निश्चित करेल. ऑपरेशन सिंदूर हे याचे उदाहरण आहे, असेही ते म्हणाले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या साम्राज्याला विस्तारित करण्याचा श्रीमंत बाजीराव पेशवे यांचा इतिहास -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांनी जिजाऊ माँसाहेबांच्या मार्गदर्शनाखाली जनतेला एक करून मुघल साम्राज्याच्या चारही आक्रमकांना सळो की पळो करून सोडले. या प्रेरणेतून अनेक पराक्रमी योद्धे तयार झाले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखीचे दर्शन

## मुख्यमंत्री यांचा पालखी खांद्यावर घेऊन दिंडी सोहळ्यात सहभाग



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर (जिमाका): आषाढी शुद्ध एकादशी निमित्ताने वाखरी येथे पोहोचलेल्या आळंदी येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भेट देऊन श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखीचे दर्शन घेतले. श्री. फडणवीस यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या समवेत पालखी खांद्यावर घेऊन दिंडी सोहळ्यात सहभाग घेतला.

टाळ मृदंगआणि विठू माऊलीच्या गजरात वातावरण भक्तीरसात न्हाऊन निघाले. प्रारंभी श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखीचे प्रमुख विश्वस्त योगी निरंजन नाथ यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांचे श्री माऊलींची प्रतिमा देऊन स्वागत केले.

वाखरी येथे जिल्हा प्रशासनाने वारकरी, भाविक यांच्यासाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या सोयीसुविधांची पाहणीदेखील मुख्यमंत्री फडणवीस यांनी केली. वारकऱ्यांसाठी करण्यात आलेल्या सुविधांबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी आमदार समाधान आवताडे, आमदार गोपीचंद पडळकर, अभिजित पाटील, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पोलीस विशेष महानिरीक्षक सुनील फुलारी, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, महापालिका आयुक्त सचिन ओंबासे, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, माजी आमदार राम सातपुते यांच्यासह हजारो वारकरी भाविक उपस्थित होते.

# हभप.निवृत्ती महाराज देशमुखच (इंदोरीकर) यांचा आज अकलूज येथे भव्य कीर्तन सोहळा





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अकलूज प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : लोकनेते कै.प्रतापसिंह शंकरराव मोहिते-पाटील यांचे पुण्यतिथी निमित्त महाराष्ट्र राज्य जनसेवा संघटनेचे वतीने, समाज प्रबोधनकार हभप निवृत्ती महाराज देशमुख (इंदोरीकर) यांच्या भव्य हरिकीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा कीर्तन सोहळा विजय चौक अकलूज येथे सोमवार दिनांक ७/७/२०२५ रोजी सायंकाळी ६ ते रात्री १०.० वाजेदरम्यान होणार आहे. मागील ९ वर्षांपासून महाराष्ट्र राज्य जनसेवा संघटनेचे वतीने समाज प्रबोधनकार हभप. श्री . निवृत्ती महाराज देशमुख इंदुरीकर यांचे हरीकिर्तनाचा कार्यक्रम आयोजित केला जातो आहे. याचबरोबर जनसेवा संघटना व सोलापूर जिल्हा तालीम संघाचे वतीने महाराष्ट्र केसरी पै.वेताळ शेळके यांचा एक लाख रुपयांची देणगी व सन्मानचिन्ह तसेच त्यांच्या आई वडिलांचा संपूर्ण कपड्यांचा आहेर देऊन सत्कार करण्यात येणार आहे.

त्याच बरोबर शाहीर राजेंद्र कांबळे यांना अखिल भारतीय नाट्य परिषदेच्या वतीने सर्वोत्कृष्ट लोककलावंत पुरस्कार मिळाले बद्दल सहकुटुंब सहपरिवार सत्कार करण्यात येणार आहे.

ह.भ.प.श्री.अशोक शिंदे महाराज गुरसाळेकर यांचा सोनी ढत मराठी वरील आयोजित केलेल्या कोण होणार महाराष्ट्राचा लाडका किर्तनकार स्पर्धेत उप विजेते झालेबद्दल सहकुटुंब सहपरिवार सत्कार करण्यात येणार आहे.

यासह विविध संस्थेच्या वतीने लोकनेते कै.प्रतापसिंह मोहिते -पाटील यांचे पुण्यतिथी निमित्त अनेक समाजोपयोगी कार्यक्रम आयोजित केले आहेत.

तरी सर्व नागरीकांनी वेळेवर उपस्थित राहुन या हरिकीर्तन सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ .धवलसिंह मोहिते-पाटील यांनी केले आहे.

# कन्हेरी येथे आषाढी निमित्त कन्हेरी ते औसा पायी दिंडी सोहळा संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/अमर जाधव : बा विठ्ठला आमच कन्हेरी गाव सुखी सम्रद्ध निरोगी ठेव, माझ्या गावचा शेतकरी बळीराजा सुजलाम सुफलाम असू दे अस साकड यावेळी वारकऱ्यांनी विठुरायाकडे घातल.

औसा तालुक्यातील कन्हेरी येथे आषाढी एकादशी निमीत्त २००८ पासून परंपरागत दरवर्षी प्रमाने याही वर्षी कन्हेरी गाव ते प्रति पंढरपुर नाथ संस्थान मठ औसा येथे पायी दिंडी सोहळा साजरा करण्यात आला, औसा तालुक्यातील कन्हेरी गाव हे धार्मिक व सांप्रदायिक गाव म्हणून गावची ओळख आहे औसा मठ संस्थांचे हरिभक्त परायण वीरनाथ मल्लिनाथ महाराज यांच्या कृपा आशीर्वादाने व हरिभक्त परायण गहिनीनाथ महाराज औसेकर व गुरुबाबा महाराज औसेकर यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी कनेरी गावातून आषाढीनिमित्त कनेरी गावातील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात पाऊल खेळत, भजन गात ,आरती करून पायी दिंडी सोहळ्याला सुरुवात करण्यात आली.

पायी दिंडी सोहळयामध्ये कन्हेरी गावातील लहान थोर मंडळी व महिलांचा विशेष सहभाग होता यावेळी महिलांनी डोक्यावर कलश घेऊन पारंपारिक पद्धतीने फुगडी खेळत विठू नामाचा गजर करत अवघी कन्हेरी नगरी दुमदुमुन गेली होती, या.रे यारे लहान थोर मनत कन्हेरी ग्रामस्थांनी पायी दिंडीत हजारो भाविकांनी सहभाग घेतला.

यावेळी गौतम बोडके,चैतन्य बोडके,उद्धव घोटाळे, प्रल्हाद झीरमीरे, रमेश बोडके, पंडीतरव घोटाळै, पार्वती मसलगे, लक्ष्मीबाई जोगदंड, छायाबाई बोडके, शशिकला झिरमीरे .कल्यान झीरमीरे, सह गावातील पुरुष व महिला भजणी मंडळ ग्रामस्थ व भाविक भक्त उपस्थीत होते.

# छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मंदिराच्या परिसरात वृक्षारोपण



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे/प्रतिनिधी : शिवजयंती उत्सव समिती वस्तू व सेवा कर विभाग तसेच ठाणे वनविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने भिवंडी तालुक्यातील प्रसिद्ध अशा महाराष्ट्रातील पहिल्या शिव मंदिराच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

सदर वृक्षारोपण कार्यक्रमास वस्तू व सेवा कर विभागाचे उपायुक्त उमेश जाधव तसेच पडघा वन विभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी रमेश रसाळ, वनपाल मंगेश शिंदे तसेच त्यांचे कर्मचारी उपस्थित होते. या वेळेस बोलताना उमेश जाधव यांनी सांगितले की, आमचे गेल्या अनेक वर्ष आम्ही वृक्षारोपण करत असून आज महाराष्ट्रातील पहिले छत्रपती शिवाजी महाराजांचे मंदिर मराडे पाडा येथे आम्हाला वृक्षारोपण करण्यास मिळाल्याने आमचे सर्व सहकारी अतिशय आनंदी आहेत. त्याचबरोबर पडघा परिक्षेत्राचे वनाधिकारी रमेश रसाळ यांनी सुद्धा आपले मनोगत व्यक्त केले.




# वागदरी येथे शालेय विद्यार्थ्यांची वारकरी दिंडी संपन्न: गावातील वातावरण भक्तिमय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के. गायकवाड : ग्रामदैवत श्री संत सदगुरु भवानसिंग महाराज यांच्यामुळे वारकरी सांप्रदायाचा वारसा लाभलेल्या वागदरी ता. तुळजापूर येथिल जि.प.प्राथमिक शाळेतील शालेय विद्यार्थ्यांनी आषाढी एकादशी निमित्ताने टाळ मृदंगाच्या गजरात काढली वारकरी दिंडी.यामुळे गावातील वातावरण भक्तीमय झाले होते.

प्रारंभी शिक्षण प्रेमी नागरीक तथा भाजपाने तालुका उपप्रमुख किशोर सुरवसे,भाजपा मिडीयासेल चे किशोर धुमाळ, रिपाइं (आठवले)चे एस.के. गायकवाड, पालक सचिन पाटील आदींच्या प्रमुख उपस्थितीत शाळेचे मुख्याध्यापक तानाजी लोहार यांच्या मार्गदर्शना खाली येथील जि.प. प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी आषाढी एकादशी निमित्ताने शाळेच्या प्रांगणात वारकरी दिंडीच्या वेशभुषे गोल रिंगण करून पंढरीच्या विठ्ठलास अभिवादन करून विठ्ठल..ऽऽ विठ्ठल..ऽऽऽ जय हरी विठ्ठल.. रामकृष्ण हरी.. ऽऽऽ असा जयघोष करित जि.प. शाळा ते मुख्य रस्यावरून श्री संत भवानसिंग महाराज मंदीरापर्यंत टाळ मृदंगाच्या गजरात वारकरी दिंडी काढली.यामुळे गावतील वातावरण अत्यंत भक्तीमय झाले होते.जागो जागी या शालेय वारकरी दिंडीचे गावातील भावीक भक्ताकडून श्रध्दायुक्त भावनेने स्वागत केले जात होते. शेवटी येथील श्री संत भवानसिंग महाराज मंदीराच्या प्रागणात या दिंडीची सांगता करून प्रत्येकानी संत भवानसिंग महाराजांचे मनोभावे दर्शन घेतले. यावेळी मंदिर परिसरात प्रतिपंढरपूर दिसून येत होते. या प्रसंगी सहशिक्षिका रेखा साखरे, संपदा माडजे, सहशिक्षक काळे सर सह विद्यार्थी ग्रामस्थ उपस्थित होते.

# भारतीय बौद्ध महासभा राज्य कार्यकारिणी घोषित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भारतीय बौद्ध महासभेच्या नूतन राज्य कार्यकारिणीची घोषणा राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. राजरत्न आंबेडकर,राष्ट्रीय महासचिव राहुल शेंडे आणि राष्ट्रीय कोषाध्यक्ष शशिकांत जाधव यांनी नुकतीच केली असून अध्यक्षपदी रविंद्र गुरचळ ( मुंबई) तर महासचिव म्हणून विजय बनसोड ( गडचिरोली) यांची एकमताने निवड करण्यात आली.

उर्वरित पदाधिकारी पुढीलप्रमाणे उपाध्यक्ष:विजय वासे,सहायक सचिव:हेमंत जाधव, कोषाध्यक्ष : रविकांत जाधव,मुख्य संघटक : बुधाजी वाढविंदे, संस्कार व शिक्षण : अरुणा इंगळे, प्रोग्राम समन्वयक: सचिन कवाडे, प्रिंट व स्टेशनरी : समन्वयक विलास जाधव, मुकेश कांबळे, तक्रार निवारण समन्वयक : तुषार गोरे, मीडिया समन्वयक : डॉ.डी.एन.जाधव, सदस्य म्हणून कैलाश ढेंगळे, सुरेखा महिरे, प्रीती रामटेके, रामदास घेवंदे,विधीज्ञ सोनाली मेश्राम,छाया हिवाळे, मंगला बिरारे, निरंजन जाधव, महेंद्र मेश्राम, तर कोकण विभाग :सुधीर धामणकर, महेंद्र जाधव, पुणे विभाग :राजश्री गायकवाड, सुजाता सोनकांबळे, नाशिक विभाग: शुभांगी डोंगरे, शालीग्राम गायकवाड,औरंगाबाद विभाग: किरण सोनवणे, गणपत भद्रे, अमरावती विभाग: महादेव तायडे, अनिल वानखेडे आणि नागपूर विभाग प्रभारी म्हणून अशोक गडकरी ,नीरज ताकसांडे यांचा कार्यकारिणीत समावेश आहे.अशी माहिती राज्य मीडिया समन्वयक डॉ.डी.एन.जाधव यांनी दिली.

**वैनतेय विद्यालयाने शहरातून टाळमृदुंगाच्या गजरात विठुरायाच्या घोषात वारकरी दिंडी**

**बालवारकऱ्यांचा उत्साह शिगेला**

# निफाड येथे आषाढी एकादशीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : आषाढी एकादशीनिमित्त निफाड येथील वैनतेय विद्यालयाच्या वतीने विठ्ठलनामाच्या घोषात , टाळ मृदुंगाच्या गजरात.भक्तीभावाने शहरातून वारकरी दिंडी काढण्यात आली होती

निफाड येथील श्री विठ्ठल रखुमाई मंदिर येथे धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते तर न्या. रानडे विद्या प्रसारक मंडळ संचलित वैनतेय विदयालय , वैनतेय इंग्लिश मीडियम स्कूल,वैनतेय प्राथमिक विद्यामंदिर ,वैनतेय शिशुविहार या चारही शाखांमध्ये आषाढी एकादशीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते

वैनतेय विद्यालयात आयोजित कार्यक्रमात प्रारंभी सजवलेल्या पालखीत ठेवलेल्या विठ्ठल रखुमाईच्या प्रतिमेचे पूजन न्या. रानडे विद्या प्रसारक मंडळ संस्थेचे कार्यकारी विश्वस्त वि.दा. व्यवहारे , संस्थेचे सचिव रतन वडघुले, संस्थेचे विश्वस्त दिलीप वाघवकर,राजेश सोनी, मधुकर राऊत, विश्वास कराड यांच्या हस्ते करण्यात आले याप्रसंगी वैनतेय विद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या मनीषा गुजराथी,पर्यवेक्षक गुलाब टकले ,पर्यवेक्षक बी .बी गुंजाळ, वैनतेय इंग्लिश मीडियम स्कूलच्या प्राचार्या

पल्लवी सानप , वैनतेय प्राथमिक विद्या मंदिराच्या मुख्याध्यापिका सुजाता तनपुरे, वैनतेय शिशुविहारच्या मुख्याध्यापिका प्रसन्ना कुलकर्णी यांच्यासह शिक्षक ,विद्यार्थी उपस्थित होते याप्रसंगी विठ्ठल रखुमाईची आरती म्हणण्यात आली.

अंकित जाधव या विद्यार्थ्याने विठ्ठलाची तर वेदिका ठाकरे या विद्यार्थिनीने रखुमाईची वेशभूषा केली होती वैनतेय विद्यालयात टाळ मृदुंगाच्या गजरात विठ्ठल रखुमाईच्या नामघोषाचा गजर करण्यात आला धनश्री डुंबरे ,ज्ञानल कुंदे यांनी भारुड सादर केले वैनतेय गीतमंचने विठ्ठलाच्या पायी वीट झाली भाग्यवंत हा अभंग म्हटला.

गोलाकार रिंगणामध्ये विद्यार्थ्यांनी ,वारकऱ्यांनी विठ्ठल नामाचा, ज्ञानबा तुकारामचा जयघोष केला याप्रसंगी शिक्षक ,शिक्षिका व मान्यवरांनी फुगडीचा आनंद घेतला.

यानंतर वैनतेय विदयालय विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची वारकरी दिंडी, निफाड शहरातून काढण्यात आली या दिंडीचा प्रारंभ वैनतेय विद्यालयापासून करण्यात आला या दिंडीच्या अग्रभागी सजवलेल्या पालखीत विठ्ठल रखुमाईची प्रतिमा ठेवलेली होती प्रारंभी वैनतेय विद्यालयाचे ढोल ताशापथक होते तसेच विद्यार्थी आणि विद्यार्थिनी यांनी वारकऱ्यांची वेशभूषा केली होती ही वारकरी दिंडी शहरातून जात असताना विद्यार्थ्यांनी विठ्ठल रखुमाईच्या नामघोषाचा गजर केला ही दिंडी शिवाजी चौक ,शनिमंदिर मार्गे निफाड येथील श्री विठ्ठल रखुमाई मंदिर येथे आणण्यात आली विठ्ठल रखुमाई मंदिर येथे वैनतेय विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी अभंग म्हटले यानंतर विद्यार्थ्यांना फराळ वाटप करण्यात आले.

**श्री विठ्ठल रखुमाई मंदिर**

निफाड येथील पुरातन श्री विठ्ठल रखुमाई मंदिर येथे श्री विठ्ठल रखुमाई मंदिर देवस्थान संस्थान व निफाडकर ग्रामस्थ वतीने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते पहाटे काकड आरती त्यानंतर श्री अभिषेक व इतर धार्मिक कार्यक्रम संपन्न झाले या मंदिरात दर्शनासाठी आलेल्या सर्व भक्तांना फराळाच्या प्रसादाचे वाटप करण्यात आले ,श्री विठ्ठल रखुमाई मंदिर देवस्थान संस्थान व शहरातील विविध सामाजिक संस्था यांच्या वतीने आलेल्या भक्त जणांना फळ वाटप करण्यात आले सायंकाळी सामुदायिक हरिपाठ संपन्न झाला या मंदिरात भक्तगणांनी दर्शनासाठी दिवसभर गर्दी केली होती.





# नळदुर्ग शहरात आषाढी एकादशी निमित्त भक्तिमय वातावरणात पालखी मिरवणूक संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : आषाढी एकादशी निमित्त दि. ०६ जुलै रोजी नळदुर्ग येथील मराठा गल्ली येथील भजनी मंडळाच्या वतीने नळदुर्ग शहरातुन भव्य पालखी मिरवणुक काढण्यात आली. या पालखी मिरवणुकीमुळे शहरातील वातावरण भक्तिमय झाले होते.

दि. ६ जुलै रोजी संपूर्ण राज्यात आषाढी एकादशीचा उत्सव मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. नळदुर्ग शहरातही आषाढी एकादशीचा उत्सव मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. शहरातील मराठा गल्ली येथील भजनी मंडळाच्या वतीने शहरातुन भव्य पालखी मिरवणुक काढण्यात आली. सकाळी ८ वा. मराठा गल्ली येथील विठ्ठल - रुक्मिणी मंदिरातुन माऊलीची पालखीतुन टाळ - मृदंगाच्या गजरात भव्य मिरवणुक काढण्यात आली. ही मिरवणुक मराठा गल्ली येथुन निघाल्यानंतर पांचपीर चौक, भोई गल्ली, क्रांती चौक, चावडी चौक, महात्मा बसवेश्वर महाराज चौक, भवानी चौक,राम मंदिर, सावरकर चौक, धर्मवीर संभाजी महाराज चौक मार्गे दुपारी १२ वा. मराठा गल्ली येथील विठ्ठल - रुक्मिणी मंदिरात आल्यानंतर मिरवणुकीचे विसर्जन करण्यात आले.

मिरवणुक निघाल्यानंतर

## टाळ - मृदंगाचा गजर व गुलाब पुष्प फुलांची उधळण कार्यक्रमाचे आकर्षण ठरले

मिरवणुक मार्गावरील प्रत्येक चौकात मिरवणुकीचे स्वागत करून माऊलीचे दर्शन घेण्यासाठी नागरीकांनी विशेष करून महिलांनी मोठी गर्दी केली होती. अनेक ठिकाणी रांगोळी काढुन व पालखीवर फुले उधळुन मिरवणुकीचे स्वागत करण्यात आले. टाळ - मृदंगाचा गजर व बहारदार भजन तसेच मिरवणुकीतील सहभागी झालेल्या महिला, पुरुष, युवक लहान मुलींनी टाळ - मृदंगाच्या तालावर फुगडी खेळुण आनंदोत्सव साजरा केला. यावेळी बंदोबस्तासाठी असलेल्या महिला पोलिस कर्मचारी व होम गार्ड महिला कर्मचाऱ्यांनीही फुगडी खेळण्याचा आनंद लुटला. पालखी मिरवणुक सावरकर चौकात आल्यानंतर माजी नगरसेवक विनायक अहंकारी यांच्या निवासस्थानी त्यांनी पालखीचे भव्य स्वागत करून मिरवणुकीतील नागरीकांना केळी व शाबु चिवड्याचे वाटप केले.

या मिरवणुकीत भजनी मंडळाचे मोहीत कलकोटे, खाटमोडे, तानाजी जाधव गुरुजी, मिलिंद भुमकर, बलभीमराव मुळे, सुभद्राताई मुळे,विमलबाई काळे,महेश जाधव, संजय बेले, मोहन डोंगरे, सुहास येडगे, तानाजी जाधव, तानाजी मुळे,कुरुक्षेत्र किल्लेदार, विलास येडगे, सुधीर हजारे, संतोष पुदाले, सरदारसिंग ठाकुर,अन्ना जाधव, तुकाराम जाधव,धनाजी जाधव, दीपक काशिद, डॉ. दीपक जगदाळे,अमर भाळे, सुधीर हजारे, अमोल सुरवसे, बालाजी ठाकुर, शिवाजी सुरवसे, तानाजी सुरवसे, प्रशांत पवार यांच्यासह शिवशाही तरुण मंडळाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व भजनी मंडळाच्या महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मिरवणुक सोहळ्यानंतर सर्व भाविकांना मराठा गल्ली येथे महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

# 'संवाद वारी' प्रदर्शनाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट

## माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचा उपक्रम; मान्यवरांची उपस्थिती



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्य शासनाच्या विविध विभागांच्या ठळक लोककल्याणकारी योजना, उपक्रमांची माहिती देणाऱ्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालय मार्फत आयोजित 'संवाद वारी'या चित्र प्रदर्शनाच्या दालनाला भेट दिली. माहिती व जनसंपर्क विभागाचे संचालक डॉ. गणेश मुळे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांचे स्वागत केले.

कृषी उत्पन्न बाजार समिती पंढरपूर येथे आयोजित या प्रदर्शनाला मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्यासमवेत पालकमंत्री जयकुमार गोरे, कृषीमंत्री ड. माणिकराव कोकाटे, पणन मंत्री जयकुमार रावल, आमदार गोपीचंद पडळकर, समाधान आवताडे, आमदार रणजीत मोहिते पाटील, गोपीचंद पडळकर, विजय देशमुख, समाधान आवताडे, अभिजीत पाटील, माजी आमदार प्रशांत परिचारक, पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, पुणे विभागीय उपसंचालक डॉ. किरण मोघे आदी उपस्थित होते.

या प्रदर्शनाला वारकरी शेतकऱ्यांनी मोठा प्रतिसाद दिला. कलापथकाच्या कलाकारांनी मनोरंजनाच्या माध्यमातून शासकीय योजनांची माहिती सादर करत वारकऱ्यांची दाद मिळविली. या प्रदर्शनात ३० फ्लेक्स पॅनेलचा समावेश आहे. पशुसंवर्धन विषयक किसान क्रेडिट कार्डची सुविधा पशुपालकांना देणे, पशुधन अभियानांतर्गत उद्योजकता विकासाला चालना, बळीराजा शेतकऱ्याच्या उन्नतीसाठीच्या योजना व घेतलेले निर्णय, नागरिकांना भेसळविरहित अन्नधान्य मिळावे यासाठी सुरक्षित अन्न तपासणीच्या सुविधा, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना, कृषी योजनांच्या लाभासाठी ग्रीस्टॅक नोंदणी, 'महाविस्तार- एआय' प, सायबर सुरक्षितता, जलसिंचनासाठीचे प्रकल्प, सामाजिक न्यायासाठी मंत्रालयात ज्येष्ठ नागरिक कक्ष स्थापना, तृतीयपंथीयांच्या हक्कांचे संरक्षण आणि कल्याणकारी मंडळाची पुनर्रचना, आदिवासींच्या उत्थानासाठी महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोगाची स्थापना, प्रधानमंत्री आवास योजना टप्पा २ अंतर्गत ३० लाख घरे मंजूर, पीएम- जनमन, रमाई, शबरी, अटल बांधकाम कामगार वसाहत, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, मोदी आवास योजना आदी योजनांची माहिती देण्यात आली आहे.

याशिवाय पशुसंवर्धन अंतर्गत मुख्यमंत्री पशुस्वास्थ्य योजना, राज्य स्तरावर कॉल सेंटरची स्थापना, पशु आरोग्य सेवांसाठी टोल फ्री क्रमांक, सहकार विभागांतर्गत आपले सहकार पोर्टलवर सहकार विभागाच्या ऑनलाईन सेवा उपलब्ध, परिवहन विभागांतर्गत महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण २०२५, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर वसतिगृह योजना, गोवारी बांधवांच्या विकासासाठी स्वतंत्र योजना, दिव्यांगणसाठी स्वतंत्र विभाग, उच्च व तंत्र शिक्षण अंतर्गत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची अंमलबजावणी आदी माहिती या प्रदर्शनात फ्लेक्स पॅनेलवर प्रदर्शित करण्यात आली आहे.

# आषाढी एकादशी निमित्त अजान वृक्षाचे वृक्षारोपण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : आरंभ फाउंडेशन कडून आज आषाढी वारी निमित्त माऊलींचा आराध्य वृक्ष असलेला अजान, पिंपळ वृक्षाचे रोपण चंद्रभागा लॉन, सेक्टर १६, बालघरे यांच्या शेतीच्या बांधावर येथे करण्यात आले.

संस्थेने असा संकल्प केला आहे महाराष्ट्रातील मंदिरे, संस्थान, माऊली भक्त व ज्या ठिकाणी अजान वृक्षाचे संगोपन होईल अशा ठिकाणी अजान वृक्ष देणे व वृक्षारोपण करून दुर्मिळ होत असलेला अजान वृक्षाची संख्या वाढवण्यासाठी सेवा हाती घेतली आहे. आतापर्यंत शेगाव, खामगाव, शेंडगेवाडी पंढरपूर, आळंदी सिद्धबेट, पैठण, आयुर्वेदिक डॉक्टर यांना ही रोपे देण्यात आलेली आहेत.



वैष्णवी पाटील म्हणाल्या.

आपल्या संस्कृतीमध्ये वृक्षांना देवाचे स्थान दिलेलं आहे . जिवंत ईश्वर तत्व जर कशात असेल तर ते झाडांमध्ये आहे म्हणून प्रत्येक देवताचा आराध्य वृक्ष म्हणून विविध वृक्षांना स्थान दिलेला आहे. आपण वृक्षांची पूजा करत असतो. माऊलींचा आराध्य वृक्ष आजान हा माऊली म्हणूनच आम्ही सर्वत्र पोहोचवण्याचं काम करत आहोत. माऊलीच आमच्याकडून ही सेवा कार्य करून घेत आहे.

वारकरी संप्रदायामध्ये या वृक्षास खूप महत्त्वाचं स्थान आहे, हा ज्ञानवृक्ष, औषधी गुणांनी युक्त, अध्यात्मिक उन्नती करण्यासाठी वारकरी याच्या सानिध्यात साधना करतात असा हा माऊली वृक्ष सर्वत्र पोहोचवण्यासाठी सेवा कार्य चालू आहे. आज बालघरे यांच्या शेतीच्या बांधावरती हा वृक्ष आषाढी एकादशी निमित्त पविठूचे नामस्मरण, भजन, पूजन करून रोपण केले. भक्ती भावनेने संगोपनाची जबाबदारी घेतली.

यावेळेस तानाजी भोसले, प्रभाकर तांबडे ,वसंत गायकवाड, पांडुरंग बालघरे, वैजनाथ गडगीळ,विजय बालघरे, रूपाली पाटील, वंदना तांबडे, वैष्णवी पाटील, स्वाती बालघरे, श्रुती बालघरे अन्वी बालघरे, अण्णासो आदी उपस्थित होते.

# पडघा टोल नाक्यासमोर, खड्ड्यांवर खडीची मलमपट्टी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव :

भिवंडी तालुक्यातील पडघा ,अर्जुनली, टोल नाक्याच्या १०० मिटर वर मोठे खड्डे पडले असून खड्ड्यांवर खडीची मलमपट्टी करण्यात आली असून प्रवाशांची फक्त समजूत काढण्यात आली आहे. तर त्या खडीवरून वाहने घसरून अपघात होण्याची शक्यता प्रवाशांकडून वर्तवली जात आहे. त्यातुन वाट काढताना नागरीकांना, वाहनचालकांना, विद्यार्थ्यांना, रुग्णांना जीव मुठीत घेऊन तारेवरची कसरत करावी लागत असुन प्रवाशांमधून नाराजीचा सूड उमटत आहे.पडघा टोल नाशिक महामार्गावर १०० मीटरच्या अंतरावर मोठे खड्डे पडले असून काही ठिकाणी रस्त्याची अतिशय दुरवस्था झाली असून मोठे खड्डे दिसून येत आहेत. खड्डे कायम स्वरुपी कधी बुजवले जाणार? असा संतप्त सवाल नागरिकांकडून होत आहे. नाशिक महामार्ग हा राष्ट्रीय महामार्ग असून दिवसभरात नाशिक ते मुंबई कडे जाणाऱ्या मोठ्या प्रमाणात





गाड्यांची वर्दळ दिवसभरात सुरू असते. त्यात पावसाचे दिवस असल्याने रस्त्याची चालणं होऊन मोठे खड्डे पडले असुन ते पावसाच्या पाण्यामुळे भरल्याने त्यातुन वाट काढताना नागरीकांना, वाहनचालकांना, विद्यार्थ्यांना, रुग्णांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. पावसाच्या पाण्याने भरलेल्या खड्ड्यांमुळे वाहने कासवाच्या गतीने जात आहेत. तर अनेक ठिकाणी खड्ड्यांमुळे प्रवाशांना आपला जीव गमवावा लागलेला आहे.

तर नागरिकांना खड्ड्यांमुळे कमरेचे आणि मानेचे आजार जडत आहे.संबधित प्रशासनाकडून खड्ड्यांसाठी अशी कुठलीही ठोस उपाययोजना केली जात नसून तात्पुरत्या स्वरूपात खड्डे भरले जात असून ते पुन्हा त्याच अवस्थेत असल्याची ओरड नागरिकांकडून केली जात आहे. तर संमधित पडघा टोल कंपनीचा तसेच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभागाचा याकडे दुर्लक्ष होत असून नागरिकांकडून नाराजी व्यक्त होतांना दिसत आहे. टोल वर मोठ्या प्रमाणात कर वसुली केली जाते मात्र कायमस्वरूपी खड्डे बुजवण्यासाठी का दुर्लक्ष होत आहे. हा मोठा चर्चेचा विषय बनला आहे. अनेक लोकप्रतिनिधी विविध राजकिय पक्षाचे पदाधिकारी, नेते मुबई नाशिक महामार्गावर जाण्यासाठी याच रस्त्याचा वापर करत असल्याने व बघुन सुध्दा त्यावर आवाज उठवत नसल्याने नागरीकांच्यात संतापाची लाट उसळली आहे.

## अपघाताचा वाढतोय धोका

खड्ड्यांमुळे दुचाकी स्लिप होऊन अपघात होण्याची शक्यता स्थानिक नागरिकांकडून वर्तवली जात आहे. कायमस्वरूपी खड्डे कधी बुजवणार ? असा प्रश्न स्थानिक नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

तसेच सदर खड्डे हे मुबई नाशिक महामार्गावर पडले असुन नागरिकांकडून खड्डे बुजविण्याची मागणी जोर धरू लागली आहे. पडघा टोल रस्तावर असणारे खड्डे कायम स्वरूपी समंधित पडघा टोल कंपनी व राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यावर ठोस पावले उचलत नसून फक्त खड्ड्यांवर खडीची मलमपट्टी करत असून प्रवाशांमधून नाराजीचा सूड उमटत आहे.

# घराच्या पोर्च मधील आग लावल्याप्रकरणी एकावर गुन्हा गुन्हा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, (प्रतिनिधी) : कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादी शफी अब्दुल कादिर शेख (वय-४३,रा.अंत्रोळीकर नगर,भाग १ होटगी रोड) यांच्या चार चाकी वाहनाचे नुकसान व्हावे म्हणून घराच्या पोर्च मध्ये आग लावली आहे. अशी फिर्याद शफी शेख यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात इस्माविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना ३० जून रोजी घडली. या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक वराळे हे करीत आहेत.

## पर्यावरणाची पूजा, रक्षण व संवर्धनाने जग वाचवण्याचा संतांचा संदेश

## मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते शासकीय विश्रामगृह परिसरात वृक्षारोपण

# पर्यावरण वारीच्या माध्यमातून विठ्ठल भक्तांनी पर्यावरण संवर्धनाचा संदेश गावोगावी घेऊन जावा : मुख्यमंत्री





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पर्यावरणाची वारी पंढरपूरच्या दारी हा उपक्रम १६ वर्षापासून अत्यंत प्रभावीपणे राबवला जात आहे. या माध्यमातून आळंदीपासून ते पंढरपूरपर्यंत पर्यावरण संवर्धनासाठी प्रबोधन केले जात आहे. आपल्या सर्व संतांनी पर्यावरणाची पूजा, रक्षण व संवर्धन करून जग वाचवण्याचा संदेश दिला. हा संदेश अनुसरत सर्व विठ्ठल भक्तांनी वारीच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश गावोगावी घेऊन जावा, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, आणि महाराष्ट्र कला संस्कृती मंच यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'पर्यावरणाची वारी, पंढरीच्या दारी' या आळंदी ते पंढरपूर पायी वारीच्या समारोप प्रसंगी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार समाधान आवताडे, रणजीतसिंह मोहिते पाटील, अभिजीत पाटील, माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर, विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, प्रदूषण मंडळाचे प्रभारी सचिव रवींद्र आंधळे, माजी आमदार प्रशांत परिचारक, राजेंद्र राऊत व अन्य मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री.फडवणीस म्हणाले, वातावरणात झालेल्या बदलामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत असून जल, वायू व वनराईचे महत्त्व समजून न घेतल्यास जग विनाशाकडे जाईल. त्यामुळे पर्यावरणाच्या जागर हा उपक्रम अत्यंत महत्त्वपूर्ण असून या माध्यमातून पर्यावरणाचे संवर्धनासाठी जनजागृती केली जात आहे.

संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊली महाराजांनी हिरवी वनराई फुलवण्याचे आवाहन केले तर जगद्गुरु संत तुकाराम यांच्या 'वृक्षवल्ली आम्हां सोयरी वनचरे' या अभंगातून निसर्ग संवर्धनाचा संदेश दिला. हा संदेश घरोघरी पोहोचवीत आपल्याला वनराई वाढवायची आहे, प्रदूषण कमी करायचे आहे. यासाठी प्रत्येक नागरिकांनी पर्यावरण संवर्धनातील आपली जबाबदारी ओळखून वृक्ष लागवडीसाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन श्री.फडणवीस यांनी केले.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री जयकुमार गोरे, श्रीमती अमृता फडणवीस, श्रीमती सोनिया गोरे, आमदार समाधान आवताडे, आमदार रणजीत सिंह मोहिते पाटील आदी भजनाचा टाळ वाजवत ठेका धरत ज्ञानोबा तुकाराम, जय जय राम कृष्ण हरी असा गजर करत वारकरी यांच्या समवेत भक्तीरसात दंग होऊन गेले.

यावेळी महाराष्ट्र कला संस्कृती मंचचे ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज वाबळे, श्रीमती चंदाबाई तिवाडी, शाहीर पृथ्वीराज माळी, सत्यपाल महाराजांचे सप्त खंजिरी भजन, श्रीमती शैलाताई घाडगे यांच्यासह अन्य कलाकारांनी किर्तन, भारुड, पोवाडा यांच्या माध्यमातून टाळ मृदुंगात हरिनामाचा गजर करत पर्यावरणाचे संवर्धन व समतोल राखण्यासाठी जनजागृतीपर कार्यक्रम सादर केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रदूषण विभागाचे जनसंपर्क अधिकारी संजय भुस्कटे यांनी केले